स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत तत्वज्ञान विषयातील

विद्यावाचस्पती (Ph. D) पदवीसाठीच्या प्रबंधाचा शोध सारांश

(synopsis)

विषय

संत जनाबाईंचे तत्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सचिन खोकले

तत्वज्ञान विभाग प्रमुख,

श्री. संत जनाबाई शिक्षण संस्थेचे,

कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड जिल्हा परभणी

संशोधक

सोनाली सुरेश पेकम

गंगाखेड जिल्हा परभणी

२०२१

1) संशोधन कार्याचा थोडक्यात परिचय -

प्रस्तुत संशोधनाचा विषय ''संत जनाबाईंचे तत्वज्ञानः एक चिकित्सक अभ्यास'' असा आहे.

संत जनाबाई (समाधी वर्ष - 1350) परभणी जिल्हयातील गंगाखेडच्या पावन भूमित जन्मलेल्या , स्वतःचा उल्लेख ''नामयाची दासी'' असा

करणाऱ्या एक थोर कवयित्री संत जनाबाईनी जवळपास साडेतीनशे अभंगाची रचना केलेली आहे.

संत जनाबाईचे अभंग संख्येने जरी कमी असले तरीही गुणात्मक, उपयोगात्मकदृष्टया सखोल आणि अध्यात्मिक तत्वज्ञानाची उच्च पातळी गाठणारे आहेत. सर्वसामान्य माणसापासून ते असामान्य माणसापर्यंत जनाबाईचे अभंग ज्ञान देण्याचे बहुमोल कार्य करतात.

संत जनाबाईच्या अभंगाचे सामर्थ्य सांगायचे झाले तर ज्ञान, परमार्थ. पद्यात्मक रचना आणि कथात्मक भाषा हे सर्व गुण त्यांच्या साहित्याचा वेगळेपणा दाखवत असल्यामुळे ते विश्व कल्याणासाठीही उपयोगाचे ठरतात. त्यात तिळमात्र संकोच नाही. पूर्वीप्रामाणेच आजही संत जनाबाईच्या अभंगाची गोडी तेवढीच आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक मंदीरात संत जनाबाईचे अभंग मोठया भक्तीभावाने गायले जातात. तसेच अनेक विद्यापीठांमध्यें ते अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. यातच संत जनाबाईच्या अभंगाची वर्तमानकालीन प्रस्तुतता लक्षात येते.

भक्ती, प्रेम, ज्ञान, प्रबोधन व लोकशिक्षण अशा अनेक अंगांनी संत जनाबाईचे अभंग परिपुर्ण आहेत.

2) प्रस्तावना :-

'' स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास ।

साधुसंता ऐसे केलें जनी ।।

संतांचे घरची दासी मी अंकिली ।

विठोबाने दिली प्रेमकळा ।। ''

अतिशुद्रपण, अनाथपण, दासीपण आणि या सर्वाचे बिरुद घेऊन मिरवणारे स्त्रीपण असे व्यक्तिमत्तव म्हणजे संत जनाबाई, संत वाटिकेतील जाईची वेल अशा उपाधीने त्यांना गौरवले गेले.

संत जनाबाईचे जन्मगाव गंगाखेड येथे जनाबाईचे समाधीमंदिर आहे. तर पंढरपूरजवळील गोपाळपूर येथे जनाबाईचे वास्तव्य होते. तेथे त्यांच्या वास्तव्याची खूण म्हणून जनाबाईच्या संसाराची मांडणी केली आहे. ताकाचा डेरा, दळणासाठी वापरलेले जाते. चूल, जनाबाईची वाकळ, पाण्याची विहिर अशा गोष्टी दाखविल्या गेल्या आहेत. पण त्या सर्व प्रतिकात्मक आहेत, ख-या नव्हेत.

संत जनाबाईच्या नावावर ३५० इतके अभंग उपलब्ध आहेत. पण ही संख्या सगळीकडे सारखी नाही. सकलसंत गाथेच्या व इतर ग्रंथाच्या वेगवेगळया संपादकानी ही संख्या वेगवेगळी सांगितली आहे.

3) उपलब्ध साहित्याचा आढावा

१) डॉ. शेला गावंडे " संत कवयत्री " पुणे विदयार्थी गृह प्रकाशन पूणे २००६

प्रचिन मराठी वाङःमयात मोजकीच संस्था असणा-या पण मोलाची व वैशिष्टपूर्ण भर घालणा-या संत कवयत्रिच्या साहीत्याचा अंतर्केंद्री व बाहयकेंद्री अशा प्रकारे सविस्तर विचार करावा असा या ग्रंथाचा उद्देश आहे.

२) शंकरराव खरात, " संताची सामाजिक दृष्टी "

शंकरराव खरात हे सहित्याचे अभ्यासक आहेत. आणि त्या दृष्टिने त्यांचा हा ग्रंथ महत्वाचा वाटतो या ग्रंथात १३ व्या शतकातील सामाजिक स्थितीचे दर्शन घडते. प्राचिन आणि मध्ययुगीन कालखंडात संताच्या कामगिरीची फलश्रुती वेगवेगळया प्रकारे आपल्या समोर आली असता शंकरराव खरातांचा सामाजिक अंगाने त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन महत्त्वपूर्ण आहे.

३) डॉ. अशोक कामत, " संत साहित्य काही अनुबंध " पद्मगंधा प्रकाशन पूणे, प्रथमावृत्ती २००३.

प्रस्तुत ग्रंथलेखातील विषयाची विविधता व पृथगात्मता लक्षणीय आहे शिवोपासना आणि संत साहित्य हे विषय विस्ताराने व समर्थपणे मराठीने मराठीत प्रथमच मांडला आहे. एकूणच संत साहित्याच्या उपासकांना हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे.

४) बा.र. सुखठणकर " महाराष्ट्र संत मंडळाचे ऐतिहासीक कार्य " पॉप्युलर बुक डेपो मुंबई दुसरी आवृत्ती १९६४.

महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांनी १३ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत आपल्या अभंगवाणीने इस्लामी राजवाटीपासून महत्त्वाचे कार्य केले आहे. ते खूप महत्त्वाचे आहे हेच बा.र. सुखठणकर यांनी आपल्या पुस्तकातून स्पष्ट केले.

५) डॉ. सुहासिनी इर्लेकर " संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध " स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २००७.

डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी आपल्या संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध या पुस्तकातुन संत आणि संत कवयित्री यांच्या काव्यांचा अभ्यास केलेला आहे. संताच्या काव्याचा लोक जीवनात असणारा फायदा इर्लेकर यांनी या पुस्तकाच्या माध्यमातुन सांगितला आहे.

६) संत जनाबाई शिक्षणसंस्था गंगाखेड जी. परभणी संपादक "संत जनाबाई चरित्र व काव्य" डायमंड पब्लिकेशन पूणे.

या पुस्तकातून संत जनाबाईच्या चरित्राचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत पुस्तकात त्यांचे अभंग व काव्य याचाही समावेश आहे.

७) मोहिते शिवाजीराव , "संत जनाबाईचे निवडक अभंग" , कर्मविर प्रकाशन पूणे.

या पुस्तकात शिवाजीराव मोहिते यांनी संत जनाबाईच्या अभंगाचा अभ्यास केलेला आहे. या पुस्तकात संत जनाबाईच्या अभंगातील विचार मांडण्यात आलेले आहेत.

८) भिंगारकर दा.बा. "संत जनाबाई चरित्र काव्य आणि कामगिरी" मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई

भिंगारकर दा.बा. यांनी या पुस्तकातुन संत जनाबाईचे चरीत्र त्याचे काव्य व त्यांची कामगिरी याचा समावेश केला आहे. त्यांच्या काव्याचा सौदर्याचा अभ्यास यांत केला आहे.

९) यादव मा.के. “मराठी संत कवयित्री“ स्नेहवर्धन प्रकाशन पुणे

यादव मा.के. यांनी “मराठी संत कवयित्री“ या त्यांच्या पुस्तकातून मराठी संत कवयित्री यांच्या अभ्यास कलेले आहे. यात संत कवयित्रीचे चरित्र थोडक्यात पण सविस्तरपणे मांडण्यात आले आहे.

१०) ढेरे रा. चि. “नामयाची जनी“

ढेरे रा.चि.यांना नामयाची जनी या पुस्तकात संत नामदेवाची शिष्य संत जनाबाई याचा उल्लेंख केला आहे. यात त्यांना जनाबाईचे जीवन चरित्राचा अभ्यास केलेला आहे.

4) संशोधनाची गृहितके :-

‘‘संत जनाबाईंचे तत्वज्ञानात्मक विचार आधुनिक काळाच्या संदर्भात प्रासंगिक व प्रेरणादायी असले पाहिजेत’’ असे मला वाटते.

5) संशोधनाची उदिष्टये :-

१. संत जनाबाईच्या तत्वज्ञानाचे मुलभूत योगदान स्पष्ट करणे.

२. संत जनाबाइच्या तत्वज्ञानातील स्त्रीवादी विचार स्पष्ट करणे.

३. संत जनाबाईंच्या तत्वज्ञानातून नैतिक मूल्य स्पष्ट करणे.

४. संत जनाबाईचे भक्ती विषयक विचार स्पष्ट करणे .

५. संत जनाबाईच्या विचारांचे आजच्या समाजाच्या दृष्टीने उपयोगिता स्पष्ट करणे.

6) संशोधन पध्दती :-

समाजिक संशोधन करताना संशोधकाला एखादी व्यक्ती,गट,सामाजिक संस्था किंवा एखादा समुह यांची अध्ययन एकक युनिट ऑफ स्टडी म्हणून निवड करावी लागते. त्या विशिष्ट अध्ययन एककाचे सर्वांगिण आणि परिपूर्ण असे अध्ययन करण्याच्या पध्दतीला ‘व्यष्टी अध्ययन‘ पध्दती असे म्हणतात. सामाजिक शास्त्रातील संशोधनात अध्ययनाच्या अनेक पध्दती आहेत. उदा. निरिक्षण, सर्वेक्षण, मुलाखत, प्रश्नावली, अनुसुची, व्यष्टी अध्ययन पध्दती इ. सर्व पध्दती साधारणपणे दोन भागात विभाजन केले जाते. जी तथ्ये संख्यात्मक असतात. त्यांच्या अध्ययनाकरीता सांख्यकिय पध्दतीचा उपयोग केला जातो. आणि जी तथ्ये संख्यामध्ये प्रस्तुत करता येत नाहीत त्याचे अध्ययन गुणात्म पध्दतीद्वारे केले जाते.

यष्टी अध्ययन पध्दतीत सामाजिक वर्तनाचे सखोल, अचुक सविस्तर व तपशीलवार ज्ञान प्राप्त करुन घेतले जाते. म्हणून इ. बर्गेस यांनी या पध्दतीला ‘सामाजिक सक्ष्मदर्शक यंत्र’ असे म्हटले आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात व्यष्टी अध्ययन पध्दतीद्वारे संत जनाबाईच्या विचाराचे सखोल अध्ययन करण्यात येईल. नैतिक, धार्मिक तात्विक इ. अनेक बाजुंनी संत जनाबाई यांच्या विचारांचा अभ्यास करुन विश्लेषण स्वरुपात त्याची मांडणी करण्यात येईल. व्यष्टी अध्ययनात तथ्यांचे संकलन (कंजं ब्वससमबजपवद) संबंधीत एकेकाची मुलाखत घेवून किंवा प्रत्यक्ष निरिक्षण करुन केले जाते. मुलाखत व निरिक्षणाबरोबरच व्यक्तीचे मित्र, नातेवाईक यांच्या कडून दिली गेलेली माहिती देखील महत्त्वाची असते या प्रकारे संकलीत केलेल्या तथ्यांना प्राथमिक तथ्ये असे म्हणतात. परंतु प्रस्तुत संशोधन कार्याच्या संदर्भात तथ्य संकलनासाठी प्राथमिक पध्दतीचा वापर करता येत नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संत जनाबाई या सध्या हयात नाहीत म्हणून मुलाखत व निरिक्षण या तंत्राचा वापर करता येत नाही, म्हणून या संशोधन कार्याच्या संदर्भात यष्टी अध्ययन पध्दतीने संशोधन करत असताना तथ्य संकलन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीयक किंवा प्रलेखीय स्त्रोत्रांचा प्रामुख्याने उपयोग केला जाईल. ज्यात दैनंदिन, पत्रे, ग्रंथलेख विचार, संत, व्यक्तीच्या जीवनातील घटनांची सुची, इतरांनी लिहिलेले चरित्र जीवनगाथा लेख, ग्रंथ द्वारे व्यक्तीचे व्यष्टी अध्ययन करण्यासाठी आवश्यक अशी तथ्ये प्राप्त केली जातात. अशाप्रकारे संशोधन कार्य व्यष्टी अध्ययन पध्दतीद्वारे पूर्ण करता येईल.

7) संशोधन कार्याचे महत्त्व :-

संत जनाबाईला वारकरी संप्रदयात 'संत वाटिकेतील जाईची वेल' असे संबोधले जाते. स्वतःला नामयाची दासी म्हणविण्यात जीवनाचे सार्थक मानणा-या जनाबाईची सुमारे साडेतिनशे अभंग उपलब्ध आहेत. स्त्रीमनाचा हळूवारपणा व भक्तीची उत्कटता तिच्या अभंगात एकवटलेली दिसते.

वारकरी संप्रदयात सर्वच स्त्री संतानी मोठया प्रमाणात अभंग रचना केलेली आहे. संत जनाबाईच्या अभंगातून विठ्ठलभक्तीची तळमळ, नामशक्ती, भावगिते, अंतर्मुखता, आत्मपरता, जिव्हाळा तसेच आत्मशुध्दी, भुतदया, सर्वाठायी समभाव कर्तव्यनिष्ठता जीवननिष्ठा, आत्मोध्दार ही मुलतत्वे त्यांनी काव्यातून प्रकट केली आहेत त्यांच्या अभंगातून हे सर्व विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य करत आहे. त्यामुळे लोकबंधात्मक दृष्टीकोनातून संत जनाबाईचे विचार आधुनिक काळातील लोकांना उपकारक ठरतील.

तसेच संत जनाबाईवर विपुल असे लेखन साहित्य उपलब्ध नाही. प्रस्तुत संशोधन ग्रंथरुपाने प्रसिध्द झाल्यावर संत जनाबाईच्या तत्वज्ञानातील मराठी भाषेतील साहित्याची जी कमतरता आहे. ती काही प्रमाणात दूर होईल.

i) आंतरराष्ट्रीय -

संत जनाबाईंना वारकरी सांप्रादयात 'जाईची वेल' संबोधले जाते. ज्या प्रमाणे जाईची वेल ही खूप लांबवर पसरल्या जाते. त्याच प्रमाणे संत जनाबाईचे विचार सर्वत्र पसरलेले आहेत. संत जनाबाईंनी त्यांच्या साहित्यातून मांडलेल्या विचाराची आवश्यकता ही संपूर्ण विश्वाला आहे. आज संपूर्ण देश स्त्री सक्षिमीकरण स्त्री - पुरूष समता महिला सबलीकरण या सारख्या विचारांना समाजात रूजवताना दिसून येतो. परंतू संत जनाबाईंनी त्यांच्या अभंगातून या सर्व बाबींचा उल्लेख १२ व्या शतकातच करून दिला.
'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास'

संशोधनाचा विषय हा 'संत जनाबाईचे स्त्रीवादी तत्वज्ञान - एक चिकित्सक अभ्यास' हा असल्यामुळे संत जनाबाईचे स्त्रीवादी विचार, स्त्रीवादी मत, स्त्रीवादी संकल्पना इ. सर्व बाबीचा अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात येईल. आणि प्रस्तूत संशोधनातून मिळणाऱ्या संशोधनाचा उपयोग विश्वाला नक्की होईल.

ii) राष्ट्रीय स्तर -

वारकरी संप्रदयात संत जनाबाईचे नाव अतिशय आदरपुर्वक घेतले जाते. तसेच वारकरी संप्रदयात अनेक स्त्री संतानी अभंगाची रचना केली आहे. वारकरी संप्रदायातील विचार हे संपुर्ण विश्वाला प्रेरणा देणारे आहेत.

प्रस्तुत संशोधनात संत जनाबाईची विठ्ठल भक्तीची तळमळ, नामभक्ती आत्मशुध्दी भुतदया सर्वाठायी समभाव, जिव्हाळा तसेच स्त्रीवादी विचार, स्त्रीवादी मत, बाबीचा अभ्यास केला जाईल.

देशातील कला, साहित्य व सांस्कृतीक क्षेत्रामध्ये संत साहित्याचे महत्व अतिशय मोलाचे आहे.

वारकरी संप्रदयातील संतांनी त्यांचे विचार सर्वत्र पोहचवण्याचा प्रयत्न केला. किर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्म पंजाबपर्यंत नेणारे अद्य प्रचारक म्हणजेच संत शिरोमणी नामदेव महाराज हे आहेत. आणि संत जनाबाईनां नामयाची दासी नामदेवाच्या शिष्या म्हणून ओळखले जाते. संत जनाबाईचे विचार देखील खूप मोलाचे आहेत आणि ते संपूर्ण देशासाठी महत्वाचे आहे.

iii) प्रादेशिक स्तर -

संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वरांच्या सहवासाने महाराष्ट्रात जो भक्तीचा मळा फुलविला होता त्यातील सर्वच संत आपल्या गुण वैशिष्टयांनी महाराष्ट्राला ज्ञात आहेत. हृदयाचा ठाव घेणारी अभंगवाणी लिहणारी जनाबाई तर कालजयी मानावी लागेल, जनाबाईच्या अभंगाची गोडी सम शतकानंतरही कायम आहे. त्यांची प्रासंगिकता जशी भाविक वारकऱ्यांना जाणवते तशीच आधुनिक विचारसरणी असणाऱ्यांनाही जाणवते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते वारकरी संप्रदायाच्या इतिहासात साडेतीनशे अभंगाची निर्मिती करून 'नामदेवाची दासी' असा अलौकिक जीवन प्रवास करणाऱ्या स्त्री संत म्हणजे गंगाखेड जिल्हा परभणी येथे जन्माला आलेल्या संत जनाबाई होत.

संत जनाबाई यांच्या अभंगाला अतिशय मोलाचे स्थान आहे. त्यांच्या अभंगात वेदांत आहे, तत्वज्ञान आहे व्यवहार आहे, हरिभक्तीचा जिव्हाळा आहे. 'संत जनाबाई केवळ संतकवी नव्हत्या तर जीवनाचा सुक्ष्मदृष्टीने शोध घेणाऱ्या तत्वचिंतक होत्या.

iv) संशोधनाची व्याप्ती -

प्रस्तुत संशोधनाचा विषय 'संत जनाबाईंचे तत्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास' हा असून या मध्यें संत जनाबाईचे जीवन चरित्र त्यांची अभंगे इ. अभ्यास केले जाईल तसेच स्त्रीवादा बद्दल संत जनाबाईंचे विचार देखील अभ्यासले जाईल.

संत जनाबाईनी त्याच्या विविध अभंगातून स्त्रीवादी विचार मांडले आहेत. संत जनाबाई या १३ व्या शतकात होऊन गेल्या, त्या काळी त्यांनी स्त्रीवादावर त्यांचे विचार अभंगाच्या मार्फत जनसामान्यात मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आज २१ व्या शतकात सुध्दा त्यांनी सांगितलेले विचार त्यांचे स्त्रीवादी मत अंगिकारण्यासारखे आहे. तसेच त्यांच्या त्या विचारांची खरी गरज आज आपल्याला आहे.

संत जनाबाईनी सांगितलेले सामाजिक, धार्मिक, स्त्रीवादी विचार या संशोधनातून अभ्यासले जातील. संत जनाबाईची कीर्ती एवढी महान आहे की त्यांच्या विचारांची गरज आज आधुनिक काळात आहे.

8) संशोधन कार्याची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे संत जनाबाई यांचा स्त्रीवादी तत्वज्ञानाच्या दृष्टीने संत जनाबाई यांचे स्त्री विषयक विचार, तसेच त्यांची ईश्वर संकल्पना भक्तीची संकल्पना, काव्यसौंदर्य, सामाजिक उपदेश, नैतिक मुल्य, नितिशास्त्र, धर्म, श्रध्दा अभंग इ. बार्बीवर आधारित आहे. त्यामुळे संत जनाबाई वर जे साहित्य आहे ते या संशोधनाचा भाग असणार नाहीत अर्थात संशोधकाने संशोधनाचे क्षेत्र निश्चित करुनच संशोधन केले तर ते ठराविक कालावधीत पूर्ण होते.

9) प्रकरण योजना -

प्रस्तुत संशोधन कार्य हे एकूण पाच प्रकरणांमध्ये विभागलेले असून त्यातील आशयाचे प्रकरण निहाय विवेचन खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले :- संत जनाबाईंचे चरित्र

प्रस्तुत प्रकरणात संत जनाबाई यांच्या जीवनाचा तसेच त्यांच्या तत्वचिंतना बदद्ल प्रास्ताविक माहिती असेल. ज्यामध्ये संत जनाबाईचे जीवन, व्यक्तीमत्तव, वैचारिक पार्श्वभूमी त्यांचे अभंग व इतर साहित्य त्याचे सामाजिक प्रबोधनाचे विचार इ. विषयाचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- संत जनाबाईंचे स्त्रीवादी तत्वज्ञान

प्रस्तुत प्रकरणात संत जनाबाईच्या विचारातून स्त्रीवादी तत्वज्ञान कशा प्रकारे स्पष्ट झाले त्यांच्या विचारातून स्त्री विषयक संकल्पना या प्रकरणात अभ्यासण्यात येईल आणि त्यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- संत जनाबाईंची भक्ती संकल्पना

संत जनाबाईच्या घरी श्री. विठठ्ल भक्ती दिसून येते. दामाशेटीच्या घरी भक्तीमय वातावरण व संत नामदेवाचा सहवास त्यांना लाभला. संत जनाबाईनी त्यांच्या बहुतेक अभंगातून स्वतःचा उल्लेख 'नामयाची दासी' असा केलेला आहे. आधीच शुद्र त्यात स्त्री जन्म आणि नामदेवाच्या घरी राबणारी एक दासी एवढेच तिचे स्थान सामाजिक व आर्थिक परिस्थिती देखील शुन्य एवढया प्रतिकुल परिस्थितीत असताना केवळ भक्तीच्या बळावर त्यांनी पारमार्थिक प्रगती केली.

प्रस्तुत प्रकरणात संत जनाबाईची विठठ्लावरील भक्ती विषयक विचार, भक्तीची मार्ग इ. अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे :- संत जनाबाईंचे नैतिक उपदेश

महाराष्ट्र हि संताची भुमी आहे. संत जनाबाईनी लोकशिक्षण व परिवर्तनाचे फार मोठे कार्य केले. अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला. देव हा माणसात आहे असे सांगितले. अभंग, गौळणी, रूपक, ग्रंथ काव्य यांची मोठी निर्मीती केली व त्यातून समाजप्रबोधन

केले. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, सामाजिक विषमता, वर्णभेद यावर कडाकडून हल्ला केला. अध्यात्म आणि समाज सुधारणा अशा दोन्ही भूमिका पार पाडल्या

प्रस्तुत प्रकरणात संत जनाबाईच्या सामाजिक आध्यात्मिक उपदेशांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- संत जनाबाईंच्या तत्वज्ञानाची चिकीत्सा

प्रस्तुत प्रकरणात संत जनाबाईचे स्त्री विषयक विचार स्त्री विषयक मत स्त्रीवादी भक्ती ईश्वर संकल्पना इ. सर्व बाबींची चिकित्सा करण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणात स्त्रीवादी तत्वज्ञानाची चिकित्सात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे :- निष्कर्ष -

प्रकरण सहावे निष्कर्ष असून यात प्रामुख्याने संशोधनाअंती येणा-या निष्कर्षाचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच संशोधन कार्याची उपयुक्तता स्पष्ट केली जाईल.

10) संदर्भ ग्रंथ सुची -

१. संत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड, जी.परभणी , 'संत जनाबाई चरित्र व काव्य' डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

२. डॉ. सुहासिनी इर्लेकर, 'जनाबाईचे निवडक अभंग' स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे

३. सचिन परब व श्रीरंग गायकवाड संपादक 'रिंगण' संत जनाबाई विशेषांक

४. डॉ. सुहासिनी इर्लेकर 'संत जनाबाई' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

५. संत कवी आणि कवयित्री 'एक अनुबंध' इर्लेकर सुहासिनी, प्रकाशन पुणे.

६. 'वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य' मोहिते शिवाजीराव कर्मविर प्रकाशन पूणे

७. 'संत कवयित्री जनाबाई चरित्र काव्य आणि कामगिरी' भिंगारकर दा.बा. मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई.

८. 'मराठी संत कवयित्री' यादव मा.के. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

९. 'संत जनाबाईचे निवडक अभंग' मोहिते शिवाजीराव, कर्मवीर प्रकाशन पूणे.

१०. डॉ. इनामदार हे.बि. 'संत नामदेव'

११. डॉ. केतकर प्रकाश 'संत कविता- एक दृष्टिकोन'

१२. आजगावकर ज.र. 'महाराष्ट्र संत कवयित्री'

१३. ढेरे रा.चि. 'नामयाची जनी'.

१४. दातार डॉ. आरती 'महाराष्ट्रील संत कवयित्री' डायमंड पब्लिकेशन पूणे.

१५. कौठेकर भगवान - 'संत कवयित्री' निर्मल प्रकाशन, नांदेड

मार्गदर्शक **संशोधक**

प्रा.डॉ. सचिन बाबुराव खोकले

तत्वज्ञान विभागप्रमुख,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,

गंगाखेड जिल्हा परभणी. ४३१५१४

सोनाली सुरेश पेकम

गंगाखेड जिल्हा परभणी